आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता
६ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जलसंचयाचा थेट संबंध आर्थिक प्रगतीशी असून, पाण्याचं योग्य व्यवस्थापन गरजेचं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / गुजरातमध्ये सूरत इथे 'जलसंचय जन भागीदारी' अभियानाचं केलं उद्घाटन

- आयुष मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या वैद्यकशाखांच्या विद्यार्थ्यांसाठी आता नॅशनल एक्झिट टेस्ट अनिवार्य

- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्र देशात अव्वल

- गणेशोत्सवाच्या तयारीचा सर्वत्र उत्साह

**आणि**

- २० वर्षांपेक्षा कमी वयोगटासाठीच्या जागतिक महिला कुस्ती स्पर्धेत भारताच्या ज्योती बरवालनं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

जलसंचयाचा थेट संबंध आर्थिक प्रगतीशी असून, पाण्याचं योग्य व्यवस्थापन गरजेचं असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधे सूरत इथे, 'जल संचय जन भागीदारी' या अभियानाचा प्रारंभ दूरस्थ पद्धतीने केल्यानंतर ते बोलत होते. भारतात पाण्याला ईश्वराचं रूप मानलं असून पाण्याच्या साठवणीच्या अनेक शास्त्रशुद्ध पद्धती भारतात परंपरेने विकसित झाल्या आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी पाण्याची टंचाई या समस्यांवर जलसंचयानेच तोडगा निघू शकतो, असं ते म्हणाले. सध्या सुरू असलेल्या 'जल

शक्ति अभियानाशी' हे अभियान संलग्न असणार आहे. या अभियानाद्वारे गुजरात राज्यातील जनता, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योगसंस्थाना पावसाच्या पाण्याचं पुनर्भरण अर्थात 'रेन वॉटर हार्वेस्टींग' करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा उभारण्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अभियानाअंतर्गत, गुजरातमध्ये सामुदायिक भागीदारीतून सुमारे २४ हजार ८०० बांधकामं केली जात आहेत. पावसाच्या पाण्याची साठवणूक वाढवण्यासाठी तसंच पाण्याची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**<><><><><>**

आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी शाखांमध्ये २०२१-२२ पासून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नॅशनल एक्झिट टेस्ट अर्थात एन ई एक्स टी देणं अनिवार्य असणार आहे अशी घोषणा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल केली. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन करण्याच्या दृष्टीनं स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमध्यमांशी बोलताना सांगितलं. एक वर्षांची आंतरवासिता अर्थात इंटर्नशीप पूर्ण केल्यानंतर राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावर परवाना मिळवण्यासाठी तसंच नोंदणी करण्यासाठी ही परीक्षा देणं अनिवार्य राहील.

**<><><><><>**

शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ८२ शिक्षकांना काल शिक्षक दिनानिमित्त गौरिवण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी संवाद साधला. पुण्याच्या रामकृष्ण मोरे महाविद्यालयातल्या प्राध्यापिका शिल्पा गौरी गणपुले यांचा समावेश होता

प्राध्यापक गणपुले यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली…

**होल्ड बाईट…. गौरी गणपुले**

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव सध्या जपानच्या दौऱ्यावर असून जपानच्या विविध खात्यांचे मंत्री आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांबरोबर आज त्यांची बैठक झाली. भारत आणि जपानमधली धोरणात्मक भागीदारी, डिजिटल व्यवहार, रेल्वे सेवा आदी मुद्यांवर या बैठकांमध्ये विस्तृत चर्चा करण्यात आली. जपानचे डिजिटल ट्रॅन्सफॉर्मेशन मंत्री तारो कोनो यांच्याशी वैष्णव यांनी भारत आणि जपानमध्ये डिजिटल व्यवहार अधिक व्यापक करण्याविषयी चर्चा केली.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भारतीय जनता पक्षाने काल ४० स्टार प्रचारकांची नावं जाहीर केली. यात, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा समावेश आहे. याबरोबरच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मनोहरलाल खट्टर, जी. किशन रेड्डी, जितेंद्र सिंह आणि शिवराजसिंह चौहान हे देखील प्रचाराची धुरा सांभाळतील. ९० सदस्यीय जम्मू-काश्मीर विधानसभेसाठी १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपाचा जाहीरनामा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज जम्मू इथं प्रसिद्ध करणार असल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात गेली दोन वर्ष सातत्यानं देशात अव्वल स्थानी असलेल्या महाराष्ट्रानं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतही हे स्थान टिकवून ठेवलं आहे. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत देशातल्या एकूण गुंतवणुकीच्या ५२ पूर्णांक ४६ शतांश टक्के म्हणजेच सुमारे ७० हजार ७९५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक्स माध्यमाद्वारे ही माहिती दिली. इतर आठ राज्यांमधल्या परकीय गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षा अधिक गुंतवणूक आणण्यात राज्य सरकार यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या यादीत दुसर्या क्रमांकावर कर्नाटक, तिसर्या क्रमांकावर दिल्ली, चौथ्या क्रमांकावर तेलंगणा तर पाचव्या क्रमांकावर गुजरात या राज्यांचा समावेश आहे.

<><><><><>

**महाराष्ट्रात** गणेशोत्सवाची धामधुम सुरू झाली आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी उद्या राज्यात सर्वत्र श्री गणेशाची प्रतिस्थापना होणार आहे. त्यामुळे आज विविध ठिकाणच्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश मूर्तींचं आगमन होत आहे. तसंच गणरायाचं स्वागत करण्यासाठी घरोघरी लगबग सुरू आहे. उत्सवासाठी आवश्यक सामानानं मुंबईसह राज्यात सर्वत्र बाजारपेठा फुलल्या असून भाविकांची खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. त्यातच पावसाच्या मध्येच होणाऱ्या शिडकाव्यामुळे ग्राहकांची काहीशी धांदलही उडत आहे. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या मार्गावरली वाहतूक सुरळीत राहण्यासाठी या काळात जड वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी काल वार्ताहरांशी बोलताना दिली. तसंच या उत्सवानिमित्त गणपती आरती ॲपची निर्मिती केल्याचंही

चव्हाण यांनी सांगितलं. ravindrchavan.com या संकेतस्थळावर गणपतीच्या आरतीचे व्हिडीओ आणि ऑडिओ उपलब्ध करून दिले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणं गरजेचं आहे. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती न वापरता शाडू मातीच्याच मूर्तीची प्रतिष्ठापना करावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, हा उत्सव एकोप्याने आणि आनंदाने साजरा करण्याचं आवाहन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

केरळमध्ये आजपासून दहा दिवसांच्या ओणम सणाला उत्साहात सुरुवात झाली. आज पहिल्या दिवशी अथम साजरा केला जातो. यानिमित्त राजा महाबली याच्या स्वागतासाठी सर्वत्र फुलांच्या सुंदर पायघड्या घातल्या जातात. राजा महाबली याला भगवान विष्णूंनी वामनाचा अवतार घेऊन पाताळात पाठवलं होतं. वामन जयंती आणि राजा महाबलीचं पुनरागमन यांचं औचित्य साधून ओणम साजरा केला जातो. आजच्या पहिल्या दिवशी केरळच्या संस्कृतीचं आणि विविध कलांचं दर्शन घडवणाऱ्या मिरवणुका काढल्या जातात.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशातल्या विजयवाडा इथल्या बुडामेरू कालव्याला भगदाड पडल्यामुळे निर्माण झालेली पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी भारतीय लष्कर तैनात करण्यात आले आहेत. राज्य सरकारनं लष्कराकडे मदत मागितल्यानंतर लष्करी अभियंता कृती दलाच्या ४० अभियंत्यांना हवाई मार्गाने विजयवाडा इथं नेण्यात आलं आहे. सैन्याच्या अतिरिक्त तुकड्याही तैनातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. भगदाड बुजवण्यासाठी, पूरस्थितीचं निरीक्षण करण्यासाठी आणि

पूरबाधित रहिवाशांचं स्थलांतर करण्यासाठी स्थानिक प्रशासन आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांसोबत काम करत आहे.

**<><><><><>**

२० वर्षांपेक्षा कमी वयोगटासाठीच्या जागतिक महिला कुस्ती स्पर्धेत भारताच्या ज्योती बरवालने सुवर्णपदक पटकावलं आहे. स्पेनमधे पोंतेवेद्रा इथं ही स्पर्धा झाली. ७६ किलो वजनी गटाच्या फ्री स्टाईल प्रकारात ज्योती बरवालने युक्रेनच्या मारिया ऑर्लेविचला एकही गुण मिळू न देता तिचा दणदणीत पराभव केला. ६८ किलो वजनी गटात सृष्टीनं तर ५९ किलो वजनी गटात कोमलने कांस्यपदक पटकावलं. ६२ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात भारताच्या निकीताची लढत युक्रेनच्या इरिना बोंदारबरोबर होईल. पुरुषांच्या स्पर्धा आजपासून सुरु होणार आहेत.

**//<><><><><>//**